# १०. बाबांचं पत्र



प्रिय वैष्णवी,

अनेक शुभ आशीर्वाद.

मी कामात पुरता गुरफटलो होतो, म्हणून पत्र पाठवायला उशीर होत आहे. तुझ्या आईने मला दूरध्वनीवरून सांगितले, की तुला सहामाहीचा गणिताचा पेपर खूपच कठीण गेला, म्हणून तू फार निराश झाली आहेस. पेपरहून घरी आल्यानंतर त्या दिवशी तू रडतही होतीस. मला वाटलं दूरध्वनीवरून तुझ्याशी बोलण्यापेक्षा तुला पत्र लिहूनच तुझ्याशी हितगुज करावं, म्हणून तुझ्यासाठी हे पत्र लिहीत आहे.

अगं वैष्णवी, गणिताचा पेपर कठीण गेला, म्हणून गणितानंतर असलेल्या विषयांचे पेपर अवघडच जाणार असे होत नाही ना! मग त्याच त्या गोष्टीचा विचार करत बसल्याने उरलेल्या पेपरवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. अगं, एखाद्या विषयात गुण कमी पडले, तर याचा अर्थ आपण आयुष्यात अपयशी झालो असे नाही. तुला सांगतो, गणिताशी तू मैत्री कर. मग बघ गंमत या विषयाची. तुला मुळीच भीती वाटणार नाही. गणितातील संकल्पना, संबोध, क्रिया तू नीट समजावून घे. उदाहरणे सोडवण्याचा चांगला सराव कर. हा विषय लवकरच तुझा लाडका होईल, हे अगदी नक्की.

बाळा, आणखीन एक तुला सांगतो. परीक्षेतील गुण किंवा श्रेणी महत्त्वाची आहेच; पण त्याहीपेक्षा आपल्या आंतरिक गुणांची वाढ करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. तू गोष्टी छान सांगतेस, चित्रं उत्तम काढतेस अन् सुंदर नृत्यही करतेस. हे सारं सुरू ठेव. तुझ्या आईने सांगितले, की हल्ली तू यांकडे फारसं लक्ष देत नाहीस. या कला आपले जीवन सुंदर करतात आणि आपलं व्यक्तिमत्त्वही फुलवतात, त्यामुळे प्रत्येकाने एखादी तरी कला जोपासली पाहिजे. स्वतःमधील गुणांची वाढ करायला तुला अनेक संधी मिळतील. त्यांचा तू पुरेपूर उपयोग करून घे. बाबांनी सांगितलेले ऐकून त्याप्रमाणे तू वागशील याची मला खात्री आहे.

दिवाळीच्या सुट्टीत मी गावी येणार आहे. मग आपण खूप खूप मजा करू, किल्ले बांधू, कंदील तयार करू, गप्पा मारू आणि दिवाळीचा फराळही खाऊ. खाऊवरून एक गोष्ट आठवली मला. या दिवाळीत गावी येताना तुझ्या आवडीचा खाऊ घेऊन येणार आहे. कुठला ते तू ओळखलं असशीलच. तुझा पुस्तकांचा खाऊ! गावी येताना मी तुझ्यासाठी गोष्टींची अनेक पुस्तके घेऊन येणार आहे. वाचून बघ तू. खूप आवडतील तुला. बरं, आता थांबतो. बाकी सारे भेटीअंती बोलू.



तुझे बाबा..

– एकनाथ आव्हाड

**शब्दार्थ :** **गुरफटणे** – गुंतून राहणे. **निराश** – नाराज. **हितगुज करणे** – आपल्या मनातील गोष्टी सांगणे. **विपरीत** – वाईट. **संबोध** – मूळ संकल्पना. **आंतरिक गुण** – अंगभूत गुण. **भेटीअंती** – भेट झाल्यानंतर.

## स्वाध्याय



**प्र. १. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) कठीण गेलेला पेपर –

(आ) वैष्णवीला पत्र लिहिणारे –

(इ) परीक्षेतील गुणांपेक्षा महत्त्वाचे गुण –

(ई) वैष्णवीसाठी बाबा आणणार असलेला खाऊ –


**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आईने दूरध्वनीवरून बाबांना कोणता निरोप दिला?


(आ) बाबांनी दूरध्वनीवरून बोलणे का पसंत केले नाही?

(इ) गणित विषय वैष्णवीचा लाडका होण्यासाठी बाबांनी कोणते उपाय सुचवले आहेत?


**प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**





**प्र. ४. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**




**प्र. ५.** (अ)




(आ)




**प्र. ६. सध्याच्या युगात पत्र पाठवण्याची कोणकोणती साधने उपलब्ध आहेत त्यांची यादी करा.**

**प्र. ७. दिवाळीच्या सुट्टीत तुम्ही काय काय गंमत करणार त्याची यादी बनवा.**

**प्र. ८. तुमच्या मित्राला/मैत्रिणीला पोहण्याच्या स्पर्धेत राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याचे/तिचे अभिनंदन करणारा संदेश खालील चौकटीत लिहा..**

**प्र. ९.** **'अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.'** **यासारखी दोन वाक्ये खालील चौकटीत लिहा.**

(१) ____________________

(२) ____________________

**प्रकल्प :** साने गुरुजी यांचे 'सुंदर पत्रे' हे पुस्तक मिळवा. वाचा. त्यातील तुम्हांला आवडलेली पत्रे सुरेख अक्षरांत लिहा.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषणे लिहा.**

(टवटवीत, उंच, नवा, शंभर)

(अ) हिमालय ................ पर्वत आहे.

(आ) कंपास घ्यायला आईने मला ................ रुपये दिले.

(इ) बागेत ................ फुले आहेत.

(ई) ताईने मला ................ सदरा दिला.

## आपण समजून घेऊया.

- **खालील तक्ता वाचा. समजून घ्या.**

| अ.क्र. | वाक्ये | काळ |
|---|---|---|
| (१) | अन्वर वेगाने धावतो. | वर्तमानकाळ |
| (२) | काल अन्वर वेगाने धावला. | भूतकाळ |
| (३) | उद्या अन्वर वेगाने धावेल. | भविष्यकाळ |

क्रियापदाच्या रूपावरून वाक्यांतील काळ ओळखता येतो.

काळाचे मुख्य तीन प्रकार आहेत.

१. वर्तमानकाळ

२. भूतकाळ

३. भविष्यकाळ

C6RAEL